**फॅक्स - 22028096**

**संदर्भ : 324**
**24 नोव्हेंबर 2009**

**श्री. आर.आर. पाटील**
**मा. गृहमंत्री**
**महाराष्ट्र राज्य**
**मंत्रालय , मुंबई 400 032.**

**विषय : इंग्रजीत 'बॉम्बे' ऐवजी 'मुंबई'चा उपयोग करण्यासंबंधी**

**प्रिय श्री. पाटील,**

आपल्याला माहित असेलच की माझ्या प्रयत्नामुळे केंद्र सरकारने इंग्रजीत 'बॉम्बे' आणि हिंदी मध्ये 'बंबई' या ऐवजी सर्व भाषांमध्ये मराठीतील मूळचे 'मुंबई' हेच नाव वापरावे असा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाची ब-याच ठिकाणी कार्यवाही झाली आहे. परंतु तसे न झाल्याची उदाहरणेही अधूनमधून लक्षात येतच असतात.

आजच्या दैनिक लोकसत्ताच्या मुंबई वृत्तांत या पुरवणीमध्ये पहिल्या पानावर 'हल्ला स्थानिक मदतीशिवायच ! - राकेश मारिया' या शिर्षकाखाली मुंबईचे पोलिस सहआयुक्त (गुन्हे) श्री. राकेश मारिया यांच्या नावाने एक मुलाखत प्रसिध्द झाली आहे. त्या शिर्षकाच्या वरती श्री. राकेश मारिया यांचे छायाचित्र आणि त्यांच्या मागे मुंबई पोलिसांचे बोधचिन्ह (लोगो) आहे. त्यामध्ये इंग्रजीमध्ये Greater Bombay Police असे लिहीले आहे. याचा अर्थ पोलिसांनी आपल्या बोधचिन्हामध्ये अद्यापही बॉम्बेच ठेवलेले आहे. संबंधित छायाचित्राची छायाप्रत सोबत आहे. मुंबई पोलिसांच्या अनेक वाहतुक नियंत्रणाचे फलक फक्त इंग्रजीतच असतात, मराठीत नसतात अशा तक्रारीही अधूनमधून येत असतात. त्यांचीही दखल घेण्याची गरज आहे.

माझी आपल्याला विनंती आहे की आपण वरील बाबींची नोंद घेऊन सर्व ठिकाणी इंग्रजीमधील 'बॉम्बे' ऐवजी 'मुंबई'च वापरण्याचे योग्य ते आदेश मुंबई पोलिस आयुक्तांना द्यावेत.

आपण केलेल्या कारवाईची कृपया मला माहिती द्यावी अशीही माझी विनंती आहे.

धन्यवाद.

आपला,

**(राम नाईक)**

**संलग्न : (1)**

**प्रतिलिपी** **फॅक्स : 22620557**
**श्री. राकेश मारिया**
**पोलिस सहआयुक्त (गुन्हे)**
**मुंबई पोलिस मुख्यालय**
**मुंबई 400 001.** **.......... कृपया योग्य ती सुधारणा करण्यासाठी**